# एक वेगळाच तारा



मानसीला रात्री आकाश पाहायला खूप आवडायचे. आकाशात किती तरी चमचमणारे तारे असायचे. भला मोठा चंद्र सुद्धा असायचा. कधी कधी ती बाबाच्या खांद्यावर बसायची. तिथे तिला अगदी एखाद्या राजकुमारी सारखे वाटायचे. ताऱ्यांच्या खूप जवळ गेल्यासारखे वाटायचे.

एके दिवशी बाबा म्हणाला, "आपण समुद्र किनाऱ्यावर सहलीला जायचय. आवडेल तुला?"

मानसीला काही खात्री नव्हती. "तिथे माझे तारे असतील?"

"कदाचित." बाबा म्हणाला.

जेंव्हा ते किनाऱ्यावर पोहोचले तेंव्हा रात्र झाली होती. पण आकाशात खूपच ढगांची दाटी झाली होती. त्यामुळे तारे काही दिसतच नव्हते. बाबा म्हणाला, "उद्या बघूयात काय होतंय ते."

"बरं..." निराश होत मानसी म्हणाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी ते पुन्हा किनाऱ्यावर पोहोचले. मानसी शंख-शिंपले गोळा करू लागली. तेवढ्यात मानसीला एक मजेदार वस्तू सापडली. ती एका मोठ्या, खडबडीत, केशरी रंगाच्या ताऱ्यासारखी दिसत होती. ती आकाशातून पडली होती का? आणि ती चमकत का नव्हती?

तेवढ्यात तिथे बाबा आला. तो हसून म्हणाला, "तो काही तारा नाहीये. तो तर तारामासा आहे. तो समुद्रात राहतो."

मानसीला ते ऐकून खूप गम्मत वाटली. तिने तो तारामासा पुन्हा समुद्रात सोडून दिला. परत जाणाऱ्या लाटांबरोबर तो पुन्हा आपल्या घरी गेला.



त्यानंतर मानसीने आणखी तारामासे शोधले आणि पुन्हा समुद्रात सोडून दिले. आता तिला तारे आणि तारामासे सुद्धा आवडायला लागले.

~ अनिता अमीन (अनुवाद: सुजित उपाध्ये)

१. मानसीला तारामासा कधी सापडला?

अ) समुद्र किनाऱ्यावर आ) रात्री

इ) तिच्या अंगणात ई) सकाळी

२. तारामासा सापडल्यावर मानसीने काय केले?

अ) तिने शंख-शिंपले गोळा केले. आ) ती किनाऱ्यावर गेली.

इ) ती बाबाच्या खांद्यावर बसली. ई) तिने तारामाश्याला समुद्रात सोडले.

३. तारामासा सापडायच्या आधी मानसीने काय केले?

अ) तिने आकाशात पाहिले. आ) तिने शंख-शिंपले गोळा केले.

इ) तिने आणखी तारामासे शोधले. ई) तिने लाटांबरोबर जाणारा तारामासा पाहिला.

४. किनाऱ्यावर रात्री मानसीला तारे का दिसले नाहीत?

________________________________________

________________________________________

५. मानसीचे वय किती असेल? का?

________________________________________

________________________________________

६. या गोष्टीसाठी आणखी एक छान नाव सुचवा.

________________________________________